दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९९ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अकोल्यात कमळाचे बटन दाबा,करंट इटली पर्यंत पोहोचले पाहिजे;अमित शहांचा निशाणा

## उद्धवजींना आदित्यशिवाय काहीही दिसत नसल्याची टीका

**अकोला (वृत्तसंस्था)**

अकोल्यामध्ये कमळाचे बटन एवढ्या ताकतीने दाबा की, बटन अकोल्यात दबले की करंट इटलीमध्ये जाऊन लागले पाहिजे, अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोनिया गांधी यांच्यावर टीका केली आहे. अकोला लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारासाठी अमित शहा यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अमित शहा यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. मी आज शरद पवार यांना प्रश्न विचारणार आहे. मात्र, उद्धव ठाकरेंना प्रश्न विचारुन काहीही उपयोग नाही. त्यांना तर आपल्या मुलाव्यतिरीक्त काहीच दिसत नसल्याची टीका अमित शहा यांनी केली आहे.

या वेळी अमित शहा यांनी काँग्रेसच्या वतीने करण्यात येणाऱ्या आरोपांनाही प्रत्युत्तर दिले. जोपर्यंत भारतीय जनता पक्ष आहे, तोपर्यंत या देशातून एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण कोणीच हटवू शकत नाही. ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गॅरंटी असल्याचा दावा देखील अमित शहा यांनी केला आहे. सिंचन योजनेमध्ये महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एकनाथ शिंदे - फडणवीस सरकारने देखील अनेक कामे केली असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. अकोला जिल्ह्यातील दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यासाठी भारतीय जनता पक्ष आणि आमचे सरकार प्रयत्न करत असल्याचे देखील अमित शहा यांनी म्हटले आहे.मी अकोला येथे आल्यानंतर शरद पवार यांना काही प्रश्न विचारणार आहे. शरद पवार हे मनमोहन सिंग सरकारच्या कार्यकाळात केंद्र सरकारमध्ये होते. कृषी मंत्रालय सांभाळत होते. मग त्या दहा वर्षांच्या काळात सोनिया आणि मनमोहन सिंग सरकारने किती पैसा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी दिला? असा सवाल अमित शहा यांनी उपस्थित केला. मात्र या प्रश्नाचे उत्तर शरद पवार देणार नाहीत. त्या दहा वर्षात महाराष्ट्रात मनमोहन सिंग यांच्या सरकारने एक लाख ९१ हजार करोड रुपये दिले असल्याचा दावा अमित शहा यांनी केला आहे. तर भारतीय जनता पक्षाच्या नरेंद्र मोदी सरकारने दहा वर्षांच्या कार्यकाळातच ७ लाख पंधरा हजार कोटी रुपये महाराष्ट्रला दिले असल्याचा दावा देखील अमित शहा यांनी केला आहे. या व्यतिरिक्त दोन लाख ९० हजार कोटी इन्फ्रास्ट्रकरच्या विकासासाठी, चार हजार कोटी विमानतळासाठी नरेंद्र मोदी सरकारने दिले असल्याचे अमित शहा यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला इन्व्हेस्टमेंट मध्ये नंबर एक करण्याचे काम केले असल्याचा दावा देखील अमित शहा यांनी केला आहे.



## उपमुख्यमंत्री फडणवीस आज पुलगावात

**पुलगाव । प्रतिनिधी**



महायुतीचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा दिनांक २४ एप्रिल ला सकाळी ११ वाजता लक्ष्मी सेलिब्रेशन हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे. पुलगाव शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष नितीन बडगे, सरचिटणीस रिचर्ड क्रॉस, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, विविध आघाड्यांचे पदाधिकारी यांनी केले आहे.

## पुलगाव देवळी परिसरात आ.डॉ. रामदास आंबटकर यांचा झंजावात

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारार्थ आमदार डॉ. रामदास आंबटकर यांनी विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवरांच्या भेटीचा सपाटा लावला आहे.

डॉ. रामदास आंबटकर पुलगाव येथे विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख लोकांच्या भेटी घेतल्या. त्याचप्रमाणे विविध व्यापारी, संघटनांचे प्रमुख यांच्याही भेटी घेतल्या. त्यांच्यासमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील वर्धा जिल्ह्यामध्ये झालेल्या विविध विकास कामाचा आढावा सादर करून भविष्यामध्ये मोदी सरकारची हात बळकट करण्यासाठी भाजपचे रामदास तडस यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. त्यामुळे रामदास तडस यांची निवडणुकीतील बाजू भक्कमपणे उभे राहत आहे. अनेक दिग्गज आपल्या सहकाऱ्यांना भाजपा उमेदवाराला विजयी करण्याचे आवाहन करीत आहे.

## खासदार सुनील मेंढे यांची पुलगावात प्रचाराची रणधुमाळी



**पुलगाव । प्रतिनिधी**

खासदार सुनील मेंढे यांनी दिनांक २२ ला पुलगाव परिसर पिंजून काढला. ठिकठिकाणी प्रचार रॅली काढून खासदार रामदास तडस यांना पुनश्च संसदेत पाठविण्याचे आवाहन केले.

खासदार सुनील मेंढे यांनी पुलगाव साठी विशेष वेळ काढून घुबड टोळी,दखनी फैल,हाऊसिंग बोर्ड कॉलनी,तेलघांनी फैल इत्यादी भागामध्ये वाद्याच्या गजरात कार्यकर्त्यांच्या गराड्यात दणक्यात प्रचार रॅली काढल्या. त्यांच्यासोबत ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते व शहरातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## आमदार किशोर जोरगेवार यांचा एक फोन आणि महाकाली भक्तांसाठी खुलली मदरसेची दार

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

हिंदू मुस्लिम ऐकतेची अनेक उदाहरणे आजवर चंद्रपूर जिल्हाने दिली आहे. असेच एक आदर्श उदाहण पून्हा एकदा दिसुन आले असून आमदार किशोर जोरगेवार यांनी फोन करताच जामा मस्जिद पब्लिक ट्रस्ट चा दादमहल येथील शेरेतुल इस्लाम मदरसा येथे महाकाली यात्रेकरूंना आश्रय दिला आहे.



चंद्रपुरातील महाकाली यात्रा शेवटच्या टप्प्यात पोहचली आहे. त्यामुळे राज्य व राज्याबाहेरील लाखो भाविक माता महाकालीच्या दर्शनासाठी चंद्रपूरात दाखल झाले आहे. या भाविकांच्या राहण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार आणि त्यांचे मित्र डेकोरेशन व्यावसायिक अब्दुल कादर यांच्या वतीने कोहिनूर तलाव येथे पेंडाल टाकण्यात आले होते. मात्र काल रात्रो झालेल्या वादळी वा-यामुळे पेंटाल कोसळला. त्यामुळे शेकडो यात्रेकरुंसमोर निवा-याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. ही बाब आमदार किशोर जोरगेवार यांच्या लक्षात येताच त्यांनी अब्दुल कादर यांच्या सहकार्याने याच परिसरात असलेल्या जामा मस्जिद पब्लिक ट्रस्ट च्या पदाधिकार्यांशी दुरध्वनी वरुन संपर्क साधत शेरेतुल इस्लाम मदरसा येथे यात्रेकरुंना आश्रय देण्याची विनंती केली. मदरसा कमेटीनेही यावर तात्कार होकार देत मदरसेची दारे यात्रेकरुंसाठी खुली केली.त्यामुळे माता महाकालीच्या दर्शनासाठी आलेल्या शेकडो भाविकांच्या येथे निवा-याची सोय झाली आहे. मदरसा कमेटी सदर भाविकांना सोयी सुविधा पुरवत असून हिंदू मुस्लिम ऐक्याचा संदेश देशाला देत आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनीही जामा मस्जिद पब्लिक ट्रस्ट ने घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांचे आभार मानले आहे. सोबतच मंदिर परिसरातील मंगल कार्यालये आणि सभागृह यात्रेकरुंसाठी मोकळे करुन तेथे यात्रेकरुंच्या निवासाची सोय करण्याच्या सुचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा आणि मनपा आयुक्त विपिन पालिवाल यांना केल्या आहे. या पूर्वी चंद्रपुरात आलेल्या पुरामुळे प्रभावित झालेल्या नागरिकांसाठी किदवाई हायस्कूल खुली करण्याच्या विनंतीचा किदवाई कमेटीच्या वतीने सन्मान करत पूरग्रस्तांसाठी शाळा खुली केली होती. मुस्लीम समाज नेहमी संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करतो असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचा आढावा

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पार पडली. यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटरे, जिल्हा मौखिक कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पिपरे, डॉ. श्वेता सावलीकर, डॉ. वनिता गर्गेलवार, शिक्षणाधिकारी (माध्य) निकिता ठाकरे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, तंबाखू प्रतिबंध उपाययोजनेबाबत जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम घेऊन नागरिकांना तंबाखूच्या दुष्परिणामाबाबत अवगत करावे. तसेच शाळा - महाविद्यालयाच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्री करण्यास मनाई आहे. याबाबत शाळांकडून माहिती मागवून त्यांच्या परिसरात तंबाखू विक्रीची दुकाने नाहीत, याबाबत हमीपत्र घ्यावे. शासकीय कार्यालयामध्येही तंबाखू प्रतिबंधासाठी भरारी पथके स्थापन करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.करण्यात आलेली दंडात्मक कार्यवाही : सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ कायदा (कोटपा) कलम - ४ अंतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने सन २०२३-२४ मध्ये ५६६ नागरिकांकडून ५५३७० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिस विभागाच्या वतीने गत वर्षी २०७६ प्रकरणांमध्ये ४ लक्ष १५ हजार २०० दंड ठोठावण्यात आला. तर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमन २०११ प्रतिबंध अन्नपदार्थ कार्यवाही अंतर्गत एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीतमध्ये १५ प्रकरणात १३३२९ किलो (एकूण किंमत १ कोटी ४४ लक्ष ८० हजार २२७ रुपये) साठा जप्त करण्यात आला.यावेळी मागील सभेचे इतिवृत्त, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत करण्यात येणा-या कार्याचा अहवाल सादर करणे, ३१ मे रोजी जागतिक तंबाखु नकार दिन साजरा करणे, जिल्ह्यामध्ये कोटपा कायदा कलम ४, कलम ५, कलम ६ (अ) आणि (ब) प्रभावी अंमलबजावणीबाबत चर्चा करणे, पोलिस, अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे, जिल्ह्यातील शाळा तंबाखु मुक्त करणे, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

# विदर्भ केसरी रामदासजींना यंदा विकास केसरी करा-ना. सुधीर मुनगंटीवार

**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे अत्यंत मनमिळावू आणि सर्वांना सोबत घेत वर्धा लोकसभेच्या मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय बाळगणाऱ्या विदर्भ केसरी रामदास तडस यांना विजयी करुन विकास केसरी हा बहुमान आपण मिळवून द्यावा,ही विनंती करण्यासाठी मी आलोय,असे पालक मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार म्हणालेत.ते भाजपाच्या प्रचार सभेत बोलत होते.

आपल्या पाऊण तासाच्या भाषणांत त्यांनी कांग्रेस पक्षाची जी धुळधाण झाली, त्यास त्या पक्षाचे नेतेच जबाबदार आहेत.या भागातून काँग्रेसला हद्दपार करण्याचे पातक अति महत्वाकांक्षी शरद पवारांनी केले,हे अनेक दाखले देत मतदारांना पटवून दिले.६८५ कोटींचा प्रकल्प या शहरात कोणी आणला?त्याची निविदा निघाली,गत महिन्यात रेल्वे गाडीला ना.गडकरी यांनी झेंडी दाखवून रवाना केले,हे आपण बघितले यांची आठवण करुन दिली.आजनसरा बॅरेज प्रकल्पाची निविदा प्रक्रिया अंतीम टप्प्यात आहे.मोदी सरकारच्या काळात ३७० कलम हटविले,लाल चौकात तिरंगा फडकावला,मुस्लिम महिलांना तीन तलाकच्या जोखडातून मूक्त केले, हे साधे काम नव्हते! विरोधकांकडे आता कसलेच व्हिजन नाही,म्हणून मोदी सरकार आले तर संविधान बदलतील अशा केवळ वल्गना करणे सुरु आहे.कांग्रेसचा युवा नेता पळवून शरद पवारांनी काय साध्य केले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.देशाचा पर्यायाने या मतदार संघाचा विकास करण्यासाठी जात पात बाजुला सारा आणि कमळाचे बटन दाबा,असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.



यावेळी मंचकावर भाजपाचे उमेदवार रामदास तडस, जयप्रकाश गुप्ता,आ.समीर कुणावार,किशोर दिघे,रिपाइंचे विजय आगलावे,जि.प.चे माजी अध्यक्ष नितीन मडावी,आकाश पोहाणे,अंकुश ठाकूर,शिवसेनेचे किशोर भांदककर,भाजपाचे शहराध्यक्ष राठी ,स्नेहल कलोडे आदी मान्यवर उपस्थित होते.तत्पूर्वी,आ.समीर कुणावार यांनी या लोकसभा मतदार संघात जो विकास दिसतो,त्यांचे श्रेय खा.तडस यांनाच आहे.त्यांच्या पुढाकाराने रेल्वेचे थांबे मिळाले,लाजिस्टिक पार्क होत आहे. काँग्रेसने केवळ डीन इंडियाचे भूमिपूजन केले आणि शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले होते.आम्ही लक्ष घालून नितीनजींच्या पुढाकाराने व तडस साहेबांच्या प्रयत्नाने विकास साधत आहोत,असे लक्षात आणून दिले.रामदास तडस यांनी मतदारांना सांगितले,मी सरळ मार्गी जमिनीशी जुळलेला व्यक्ती आहो.जात पात मी मानत नाही.मोदीजींचे हात बळकट करायचे असेल तर भाजपाला विजयी करा,अशी विनंती केली.यावेळी विजय आगलावे यांनी संविधानात वेळोवेळी बदल काँग्रेसनेच केलेत,हे आज त्या पक्षाचे नेते विसरलेत काय? असा सवाल उपस्थित केला.भारतमाता सुरक्षित हवी असेल तर मोदीजींना मजबूत करा,त्यासाठी रामदासजी तडस यांना २६ तारखेस भरघोस मतें द्या अशी विनंती केली.सभेचे संचालन व प्रास्ताविक ओमप्रकाश राठी यांनी केले तर आभार सुधाकर घवघवे यांनी मानले.

# लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत शरद पवार यांनी काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांच्या रायगड निवासस्थानी घेतला पाहुणचार

## एकाच कुटुंबात वीस डॉक्टर घडवणाऱ्या स्वर्गीय रामनाथ वाघ यांच्यासोबतच्या जुन्या आठवणींना दिला उजाळा






**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत वेळात वेळ काढून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांनी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय रामनाथ वाघ यांचे सुपुत्र जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष जयंत वाघ यांच्या रायगड निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. कुटुंबाच्या उच्चशिक्षणाबद्दल सदैव जागरूक असलेल्या आण्णांच्या स्वभावामुळे व उच्च विचारांमुळे आपल्या नव्या पिढीला दिशा देत घरातल्या प्रत्येकाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न ज्या रामनाथ वाघ यांनी साकार केले त्यांच्या या प्रेरणादाई वृत्तीचे कौतुक पवार यांनी यावेळी केले. सध्या वाघ यांच्या कुटुंबात वीस डॉक्टर आहेत.याप्रकारे शरद पवार आणि रामनाथ वाघ यांच्यामधील मैत्रीपूर्ण संबंधाच्या आठवणींना उजाळा दिला.मान.शरद पवारसाहेब जेव्हा नगर दौऱ्यावर आले, तेव्हा त्यांनी आवर्जुन रामनाथ वाघ यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा पाहुणचार घेतला. यादरम्यान अण्णा अर्थात जयंत वाघ यांचे वडील रामनाथ वाघ आणि शरद पवार यांच्या जवळपास १९६४ पासूनच्या आठवणींना उजाळा दिला. श्री शरद पवारसाहेब१९६४ साली महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते त्यावेळी पवारसाहेबांनी अण्णांना जिल्हा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष केले होते तेव्हापासून या दोघांमध्ये दृढ झालेल्या मैत्रीचे आणि एकमेकांच्या राजकीय कारकिर्दीचे साक्षीदार होण्यापर्यंतचा अनेक घटना व प्रसंगाचा उल्लेख या भेटीदरम्यान झाला.

स्वर्गिय अण्णांनी तयार केलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर आधारीत युगप्रवर्तक यशवंतराव ह्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा सहकार सभागृह येथे १ जानेवारी २००८ रोजी मा शरद पवारसाहेब यांच्या उपस्थितीत झाला. या तब्बल ८०० पानांच्या ग्रंथामधे यशवंतराव चव्हाण यांनी वेगवेगळ्या अनेक खात्यामधे केंद्रीय मंत्री म्हणुन भुषविलेल्या कारकिर्दीमधील ४५०पेक्षा जास्त दुर्मिळ फोटोचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच १ ऑक्टोबर २०१८ रोजी रामनाथ वाघ यांच्या वळून पाहतानाया आत्मचरित्राचा आणि कृतार्थ जीवनप्रवास ह्या अण्णांच्या गौरवग्रंथाचा प्रकाशन सोहळा ही मान. पवारसाहेबाच्या हस्तेच यशवंतराव चव्हाण सभागृहामधेच करण्यात आला. कोपरगाव येथे दूध उत्पादकांच्या मेळाव्याला जाताना रायगड निवासस्थानी नगर शहरातील प्रमुख कार्यकत्यांची बैठक पवारसाहेबांनी घेतली होती. याशिवाय अण्णांचे निधन झाल्यांनतर महाविकास आघाडीच्या खातेवाटपाच्या दिवशीही मान.शरद पवारसाहेब अंत्यविधीसाठी आवर्जून उपस्थित होते अशा अनेक घटनांचा उजाळा पवारसाहेबांनी ह्यावेळी केला. यातून एका राजकीय नेत्याच्या मनात आपल्या कार्यकर्ता मित्राप्रती असलेला आदर आणि आपुलकी दिसून येते. रायगड बंगल्यावरच्या भेटींदरम्यान जयंत वाघ आणि यांच्या पत्नी सौ. संगीता, याशिवाय लोकसभा नगर दक्षिण मतदारसंघ महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत गाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार दादाभाऊ कळमकर, अशोक बाबर, संपतराव म्हस्के, भगवान फुलसौन्दर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अभिषेक कळमकर, नगरसेवक योगीराज गाडे, डॉ.अनिल आठरे, कन्या डॉ कृतिका,डॉ धनंजय, डॉ सुमा, डॉ सागर, डॉ मृणाल, अभिजित,दुर्गा आदी उपस्थित होते. यावेळी जयंत वाघ यांनी शरद पवार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला

## ३० वर्षांनंतर भेटणार रेसिडेन्शिअल हायस्कूलचे माजी विद्यार्थी

# १९९४ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा ५ मे रोजी स्नेह मेळाव्याचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या सन १९९४ दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ५ मे रोजी सकाळी ११ वाजता नगर मनमाड रोड येथील हॉटेल संजोग या ठिकाणी ३० वर्षांनी जुने मित्र-मैत्रिण एकत्र येणार असून, या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. प्रशांत पटारे, प्रा.डॉ. विजय म्हस्के, राजेश शिंदे, विनोद बहिरवाडे, राहूल गोरे यांनी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने केले आहे.




या स्नेहमेळाच्या माध्यमातून सर्व माजी विद्यार्थी ३० वर्षानंतर एकमेकांना भेटणार आहेत. जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळणार असून, त्या काळातील अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींना संपर्क झाला असून, सर्व या स्नेह मेळाव्यासाठी येणार आहेत. काही वर्ग मित्रांना संपर्क झालेला नसल्याने त्या माजी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे सांगण्यात आले आहे.

या मेळाव्यात रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या सन १९९४ दहावी बॅचच्या अ, ब, क व ड वर्गातील सर्व विद्यार्थी एकत्र येत आहे. या कार्यक्रमासाठी त्यावेळच्या शिक्षकांना सुद्धा आमंत्रित करण्यात आलेले आहे. त्यांचा सुद्धा या कार्यक्रमात गौरव केला जाणार आहे. सर्वांशी संवाद, गप्पा, गोष्टी व जुन्या आठवणींना उजाळा या कार्यक्रमातून मिळणार आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. विजय म्हस्के ९८५०६४८४४७, राजेश शिंदे ९८२२१५२६१५, विनोद बहिरवाडे ९४२३४६५३९९ व राहुल गोरे ९७६६९२७८७८ यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

## एमएचटी- सीईटी परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर उपविभागाच्या महसूल स्थळ सीमेच्या हद्दीत २२ एप्रिल ते १७ मे, २०२४ या कालावधीत सकाळी ७-०० ते सायं. ८-०० यावेळेत एमएचटी- सीईटी परीक्षा-२०२४ परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. उपविभागीय दंडाधिकारी नगर भाग, अहमदनगर सुधीर पाटील यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम १४४ तीन अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करत परीक्षा केंद्राच्या आवाराच्या चोहोबाजूस १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

एमएचटी- सीईटी परीक्षा-२०२४ विश्वभारती कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, सारोळाबद्धी, जामखेड रोड, ता.अहमदनगर, श्री छत्रपती शिवाजी महाराज, कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, नेप्ती,अहमदनगर-कल्याण रोड, अहमदनगर, जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट, पुणे हायवे, चास, ता.अहमदनगर, आचिव्हर्स इन्फोटेक, श्री बन्सीभाऊ म्हस्के विद्यालय, टाकळी काझी, जामखेड रोड, अहमदनगर व प्रिषा इन्फोटेक, क्रिएटिव्ह इलेक्ट्रिकल्स, पारस इंडिया लिमिटेड जवळ, एमआयडीसी अहमदनगर या केंद्रावर होणार आहे.वरील परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिघात सार्वजनिक टेलिफोन,एसटीडी, आयएसडी, फॅक्स केंद्र, ध्वनीक्षेपक, झेरॉक्स मशीन, स्कॅनिंग मशीन, मोबाईल फोन व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमिक वस्तू कार्यान्वित ठेवू नयेत. तसेच परीक्षा उपकेंद्राच्या परिघामध्ये उचित रीतीने परीक्षार्थी म्हणून घोषित केलेले उमेदवार व परीक्षा पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीशिवाय इतर व्यक्तींना वाहनांनी अथवा इतर रीतीने फिरण्यास, उभे राहण्यास अथवा समवेत चालण्यास प्रतिबंध करण्यात आला असल्याचेही कळविण्यात आले आहे.

## ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघात ९ जणांना २२ नामनिर्देशन पत्रांचे वितरण

**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अनुषंगाने ३७- अहमदनगर लोकसभा मतदारसंघात आज दि. २० एप्रिल, २०२४ रोजी ०९ जणांना -२२ नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले. आजच्या दिवशी एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नाही.

सार्वजनिक सुट्यांचे दिवस वगळता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची शेवटची तारीख गुरुवार २५ एप्रिल, २०२४ अशी असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभाग, अहमदनगर यांनी दिली आहे.

## पाईपलाईन रोड वाणी नगर येथील बिल्डर्स व राजकीय वरदहस्त असलेल्या गुंड लोकांनी अडाणी व विधवा महिलेची शेत जमीन बळकवण्याचा केला प्रयत्न

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पाईपलाईन रोड वाणी नगर येथील रहिवासी वेणूबाई विठ्ठल वाणी यांची शेत जमीन गट. नं. २५/१ब, २५/१क व २५/१ड असून या मिळकतीवर बिल्डर्स व राजकीय वरदहस्त असलेले गुंड पवनकुमार नंदकिशोर अग्रवाल, आनंद प्रदीपकुमार अग्रवाल, हेमलता नवनाथ म्हस्के, राम शंकर शेळके यांनी मिळकतीमध्ये पोलिसांची मदत घेऊन व उपअधीक्षक भूमी अभिलेख अहमदनगर यांच्याकडे खोटा मोजणीचा अर्ज देऊन १९ एप्रिल २०२४ रोजी जमीन बळकावण्यासाठी अनअधिकाराने आले व



रेणूबाई विठ्ठल वाणी व इतरांनी त्यांना मोजणीस हरकत घेतली व सदरच्या मिळकतीत वाणी व इतरांची नावे असतानाही व त्यांना मोजणीची कोणतीही लेखी नोटीस न देता वरील लोकांनी सहमत करून व पोलिसांना हाताशी धरून जमीन मोजणी करण्यास सुरुवात केली त्यावेळी रेणूबाई वाणी व इतरांनी त्यास हरकत घेतली असता उपाधीक्षक भूमी लेख अहमदनगर यांच्या कार्यालयात मिळकतीचा वाद चालू असून मोजणी करण्यास हरकत असल्याबाबत लेखी अर्ज दिलेला होता परंतु वास्तविक पाहता वेणूबाई विठ्ठल वाणी व इतरांची नावे उताऱ्यावर असून पीक पाहणी सदरी विभागीय अधिकारी अहमदनगर यांनी आरटीएस अपील क्रमांक ७१/२०११ मध्ये दिनांक ७ मार्च २०१५ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे सदर मिळकतीच्या सातबारा उताऱ्याला खुद वस्तीपड म्हणून नोंद करण्यात आलेली असून देखील हे गुंड प्रवृत्तीचे लोक ताबा गँग जागा बळकवण्याचां प्रयत्न करत असल्याने यांच्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षकांची भेट घेणार असल्याचे सांगितले..

# महायुतीचे उमेदवार खा.रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोल्यात गावभेट दौरा

## २४ एप्रिलला घेरडीत तर २५ एप्रिलला कोळ्यात जाहीर सभेचे आयोजन

**सांगोला । प्रतिनिधी**

माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ बुधवार २४ एप्रिल आणि गुरुवार २५ एप्रिल रोजी सांगोला तालुक्यात गावभेट दौरा आयोजित करण्यात आला आहे. महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत घेरडी आणि कोळा या ठिकाणी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महायुतीच्या वतीने देण्यात आली आहे.

माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला तालुक्यात दोन दिवसांचा गावभेट दौरा आयोजित करण्यात आला आहे. २४ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता चिकमहुद, लक्ष्मीनगर, महिम कारंडेवाडी, खिलारवाडी, गायगव्हाण, हलदहिवडी, वाकीशिवणे, शिवणे या गावातील कार्यकर्त्यांची बैठक महूद गावात आयोजित केली आहे. सकाळी ९ वाजता कटफळ (कटफळ व इटकी गावातील कार्यकर्ते), १० वाजता खवासपूर, ११ वाजता लोटेवाडी (लोटेवाडी, अचकदाणी, ठोंबरेवाडी), १३ वाजता एखतपूर, दुपारी १ वाजता अजनाळे (अजनाळे, लिगाडेवाडी, वझरे, चिणके), २ वाजता य. मंगेवाडी, ३ वाजता वाटंबरे (वाटंबरे, राजुरी), ४ वाजता नाझरे (नाझरे, अनकढाळ), सायंकाळी ५ वाजता बलवडी, ६ वाजता चोपडी (चोपडी, बंडगरवाडी) आणि सायंकाळी ७ वाजता घेरडी येथे (घेरडी, हंगीरगे, गावडेवाडी, डिकसळ, पारे, नराळे, हबीसेवाडी) जाहीर सभा होणार आहे. २५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता संगेवाडी (संगेवाडी, शिरभावी, मेटकरवाडी, धायटी), ९ वाजता मांजरी (मांजरी, देवकतेवाडी, बामणी, देवळे, सावे), १० वाजता वाढेगांव (वाढेगांव, राजापूर), ११ वाजता मेडशिंगी (मेडशिंगी, बुरलेवाडी), दुपारी १२ वाजता आलेगांव, १ वाजता वाकीघेरडी, ३ वाजता वाणीचिंचाळे, ४ वाजता जवळा (जवळा, आगलावेवाडी, तरंगेवाडी, बुरंगेवाडी, भोपसेवाडी), सायंकाळी ५ वाजता कडलास (कडलास, डोंगरगांव, हणमंतगाव, लोणविरे, निजामपूर), ६ वाजता अकोला (अकोला, वासूद, केदारवाडी, कमलापूर, गोडसेवाडी), सायंकाळी ७ वाजता जुनोनी (जुनोनी, काळुबाळुवाडी, ह. मंगेवाडी, जुजारपूर, गुण्णापाचीवाडी, हातीद पाचेगाव खु. मिसाळवाडी, नलवडेवाडी), रात्री आठ वाजता कोळा (कोळा, कराडवाडी, कोंबडवाडी, तिप्पेहळळी, किडबिसरी, पाचेगांव बु., गौडवाडी, बुध्देहाळ, करांडेवाडी) येथे जाहीर सभा होणार आहे. या प्रचार दौऱ्यासाठी महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील आणि माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभा संपन्न होणार आहे. तसेच यावेळी शिवसेना नेते भाऊसाहेब रुपनर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजीकाका पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मधुकर बनसोडे, भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार, दुर्योधन हिप्परकर, रासपचे जिल्हाध्यक्ष सोमा मोटे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, मनसेचे जिल्हाध्यक्ष विनोद बाबर उपस्थित राहणार आहेत. तरी महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचार दौऱ्यासाठी आणि जाहीर सभेसाठी महायुतीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.



## महामानव डॉ.बाबासाहेब यांची जयंती भव्य दिव्य आणि शांततेत साजरी व्हावी-सुरजदादा

**सांगोला । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती जगभर विविध कार्यक्रमाने साजरी होत असून प्रत्येक ग्रामीण भागातील खेड्यागावा पर्यंत हा आनंदोत्सव साजरा केला जातो परंतु काही जातीवादी प्रवृत्तीना हे बोचत आहे अशी जातीवादी प्रवृत्ती काही ना काही अनुचित प्रकार घडवण्याचा प्रयत्न करतात त्याचाच एक भाग म्हणजे २ ते ३ दिवसापूर्वी सांगोला शहरात घडलेला प्रकार की आशा घटनेमुळे सामाजिक तेड निर्माण होऊन शांतता आणि सुव्यवस्था बिघडवणे हाच हेतू असतो अशा प्रवृत्तीला पायबंद घालण्यासाठी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शांततेत साजरी करावी , जयंती साजरी करताना कोणाच्या भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घ्या , गावच्या इतर समाजाच्या इतर राजकीय नेते मंडळींचा हस्तक्षेप टाळा , तो नेता महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आदर असेल तर तो स्वतः येईल , मिरवणूक काढत असताना पोलीस स्टेशन चा रीतसर परवाना घेऊन पोलीस बंदोबस्त घ्या कारण निवडणूक असल्यामुळे राजकीय नेते मंडळी स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी अनुचित प्रकार घडवून आणण्याची शक्यता नाकारता येत नाही , आपण आपल्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शांततेत साजरी करायची



आहे विघातक प्रवृत्तीला कायदेशीर रित्या पोलीस खात्याच्या मदतीने ठेचून काढू आणि त्या वाईट प्रवृत्तीला आपण सर्वजण मिळून कडाडून विरोध करू असे ग्रामीण भागातील जयंती साजरी करणाऱ्या आंबेडकरी समाज व बौद्धबांधवांना रिपब्लिकन पँथर ऑफ इंडिया चे संस्थापक अध्यक्ष व नगर सेवक सुरजदादा बनसोडे यांनी आवाहन केले.

# खडसेंनी नाईलाजाने निर्णय घेतला असावा त्यांच्यावर तपास यंत्रणांचा दबाव होता-शरद पवार

**जळगाव (वृत्तसंस्था)**
खडसेंनी नाईलाजाने निर्णय घेतला असावा. त्यांच्यावर तपास यंत्रणांचादबाव होता असे मोठे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. आज जळगाव जिल्ह्यातील रावेर लोकसभा मतदारसंघात शरद पवार गटाचा कार्यकर्ता संवाद मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी यावेळी मोदींची हुकूमशाही राजवट उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही असा हल्लबोलही केला आहे.यावेळी शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ''आज देशाचे चित्र बदललेले आहे. जो देश धान्य आयात करत होता. आता तोच देश निर्यात करत आहे. आज मोदी यांचे राज्य आहे. बळीराजाला मदत होईल असे काही सरकारकडून केले जात नाही. जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका केली जात आहे. ज्यांनी देशासाठी खस्ता खायल्या आहेत त्यांच्यावर टीका करणे हे काय पंतप्रधानांचे काम आहे का? आपण देशाचे पंतप्रधान आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ते भाजपचे पंतप्रधान असल्यासारखे वागत आहेत'' असे शरद पवार म्हणाले.पुढे पवार म्हणाले, ''आज दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र शासकीय यंत्रणेचा उपयोग हुकूमशाहीसारखा केला जात आहे. मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले जात आहे याचा अर्थ ही हुकूमशाही आहे. एखाद्याला वैयक्तिक त्रास देण्याचं काम सुरू आहे. यापूर्वी असं कधी होत नव्हतं. त्यामुळे अनेकांना यातना सहन कराव्या लागत आहेत. याचाच प्रभाव खडसेंवर झाला असावा. त्यांच्यावरही तपास यंत्रणांचा दबाव होता. त्यामुळेच त्यांनी नाईलाजाने असा निर्णय घेतला असावा'', असे शरद पवार म्हणाले. याशिवाय, ''बाबासाहेबांनी शेवटच्या माणसासाठी काम करण्याचा प्रयत्न केला होता. आता लोकांना मोदी नको आहेत. हुकूमशाही नको, लोकशाही पाहिजे आहे. मोदींची हुकूमशाही राजवट उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका यावेळी शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केली आहे.



# पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आवाहन; बीडमध्ये स्वराज्य नगर परिसरात कॉर्नर बैठक

**बीड । प्रतिनिधी**
दि.२० : महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून जिल्ह्यासह बीड मतदारसंघात केंद्र सरकारच्या योजना आणता येतील. पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.



महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ बीड शहरातील स्वराज्य नगर परिसरात शुक्रवारी (दि.२०) कॉर्नर बैठक पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नगरसेवक गणेश वाघमारे, सरपंच अतुल मुंडे, शरद गदळे, दत्ताप्रसाद सानप, आमेर सिद्दीकी, अतुल काळे, दिशांत मोराळे, विकास यादव, माजेद कुरेशी, पवार, गणेश भोसले, राहुल मुंडे, संतोष पाळवदे, राजाभाऊ क्षीरसागर आदी उपस्थित होते.डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, केंद्र सरकारच्या विविध योजना बीड शहरात देखील राबविल्या जात आहेत. त्यात प्रामुख्याने पंतप्रधान घरकुल योजना राबविली जात आहे. या माध्यमांतून शहरात ३ हजार गोर गरीब जनतेला हक्काचे घरकुल मिळाले. केंद्र सरकारच्या माध्यमातून शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची कामे झाली आहेत. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून देऊन केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवायचे आहे. त्यांच्या माध्यमातून बीड शहरात मोठ्या प्रमाणात विकासाची कामे आणायची आहेत. ती कामे पूर्ण करून देण्याची जबाबदारी ही आमची आहे, त्यासाठी पंकजाताईंना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.आवाहनाला प्रतिसाद देत स्थानिक नागरिकांनी देखील आपण आतापर्यंत आमच्या प्रभागात विविध विकासकामे करून न्याय दिला आता याची परतफेड आम्ही पंकजाताई मुंडे यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला. या कॉर्नर बैठकीला स्थानिक नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मोदींचा राजेश विटेकरांना शब्द

**परभणी । प्रतिनिधी**
काम करत रहा, लढत रहा तुमच्या त्यागाचं फळ तुम्हाला निश्चितपणे मिळेल, असा शब्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परभणी लोकसभेतून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले परंतु, पक्षनिष्ठेसाठी माघार घेतलेले राष्ट्रवादी नेते राजेश विटेकर यांना महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२०) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची परभणीतील लक्ष्मी नगरीत जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभा संपल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजेश विटेकर यांच्याशी संवाद करुन दिला. विटेकर यांच्या योगदानाची व त्यांनी केलेल्या त्यागाची माहिती देत ओळख करुन दिली. विटेकर यांनी याआधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून या ठिकाणाहून निवडणूक लढवली होती, तेव्हा वंचितने केलेल्या मत विभाजनामुळे चाळीस हजार मतांनी त्यांचा पराभव झाला, यावेळीही ते इच्छुक असतांना व त्यांचा विजय निश्चित असतांनासुध्दा त्यांना उमेदवारी मिळाली नाही, पक्षनिष्ठेसाठी त्यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांना मोकळ्या मनाने पाठींबा दिला व त्यांच्या विजयासाठी ते प्रचारात हिरीरीने पुढाकार घेत आहेत, असे फडणवीस यांनी पंतप्रधान मोदी यांना सांगितले. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी राजेश विटेकर यांना जवळ बोलावून पाठीवर हात थोपटत त्यांचे कौतूक व अभिनंदन केले. 'तुम काम करते रहो, लढते रहो, हम तुम्हारे साथ है । आपके बलिदान का फल आपको जरून मिलेगा', असा शब्दही मोदी यांनी यावेळी विटेकरांना दिला.




दरम्यान, पंतप्रधान मोदी व विटेकर यांच्यामध्ये झालेल्या संवादाची क्लिप समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असंख्य कार्यकर्ते आणि राजेश विटेकर समर्थकांच्या व्हॉट्सअप स्टेटसवर आणि सोशल मीडियामध्येही रील सध्या धुमाकूळ घालत आहे.

# एक खोट बोलल्यामुळे शंभर खोटे बोलावे लागतेय-आ.आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**
उध्दव ठाकरे हे एक खोटे बोलल्यामुळे त्यांना आता शंभर वेळा खोटे बोलावे लागते आहे, असा टोला मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ड आशिष शेलार यांनी लगावला.

आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता अशा आशयाचे विधान उबाठा गटाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी केले होते त्यावर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आमदार ड आशिष शेलार म्हणाले की, गेले दोन चार वर्षे उध्दवजी म्हणत होते की, मी आणि अमितशाह यांच्यात चर्चा झाली. अमितशाह यांनी मला मुख्यमंत्री पदाबाबत शब्द दिला होता, असा दावा त्यांनी केला होता. तर आता त्यांनी दुसरा दावा केला आहे की, माझी आणि देवेंद्रजींची चर्चा झाली. वर्षानुवर्षे दावे ते बदलत आहेत.

तशी कोणतीही चर्चा झाली नाही हे अमितभाई शाह यांनी स्पष्ट केले त्यामुळे उध्दव ठाकरे यांचे हे खोट विधान ना जनतेला पटले, ना शिवसैनिकांना पटले, त्याचा पुरावा ही त्यांच्याकडे नाही त्यामुळे आता ते आणखी एक खोटे बोलत आहेत. माझी आई मला सांगत असे की, खोटे कधी बोलू नको, एक खोटे बोलले की पुढे शंभर खोटे बोलावे लागते. उध्दव ठाकरे आपले एक खोटे पचवण्यासाठी आणखी एकदा खोटे बोलले आहेत. आणखी त्यांना कितीवेळा खोटे बोलावे लागणार आहे असा प्रश्न आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे केंद्रीय मंत्री अमितभाई शाह यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले होते की, पुत्र प्रेमातून शिवसेनेत फुटली. आज याला पुष्टी मिळाली असून शिवसैनिकाला मुख्यमंत्री पदी बसवायचे आहे असे उध्दव ठाकरे बोलत जरी असले तरी प्रत्यक्षात आदित्यलाच मुख्यमंत्री करायचे पोटात होते, त्यांच्या मनातील चांदणे आता समोर आले आहे, असेही आमदार ड आशिष शेलार म्हणाले. विशेष म्हणजे ते जे वारंवार खोटे बोलत आहेत त्याचे कुठलेही परिस्थितीजन्य पुरावे त्यांच्याकडे नाहीत, भाजपाकडे असे अनेक पुरावे असून या मुद्दयावर उध्दव ठाकरेच खोटे बोलत आहेत हेच पुन्हा पुन्हा सिध्द होते आहे असेही आमदार ड आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

# राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती पतसंस्था अपहाराची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून व्हावी

## गुन्हे दाखल झालेल्या संचालकांना अटक करण्याची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**
राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या अपहाराची व्याप्ती मोठी असल्याने सदर प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून व्हावी, गुन्हे दाखल झालेल्या संचालकांना तातडीने अटक करावे व या प्रकरणात सर्व संचालक दोषी असल्याने त्यांना सहआरोपी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा १ मे महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.



कान्हूर पठार (ता. पारनेर) येथील राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत मोठ्या प्रमाणात अपहार झाला आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होवून देखील आरोपींना जाणीवपूर्वक अटक करण्यात आलेली नाही. या पतसंस्थेत अपहाराची व्याप्ती मोठी असून, यामध्ये इतर संचालक मंडळही दोषी आहे. पतसंस्थेचा अपहार उघडकीस येण्यासाठी त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडून करण्याची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या पतसंस्थेत सहकार अधिनियमांचे उल्लंघन करून अनियमितता करण्यात आली आहे. पतसंस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे. या अपहाराची रक्कम ५० लाखापेक्षा अधिक आहे. गेल्या तीन वर्षापासून तक्रारीचा पाठपुरावा करून आज अखेर चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. पारनेर तालुक्यातील सर्वसामान्य व्यक्तींनी आपल्या जीवनाची पुंजी पतसंस्थेत ठेव म्हणून ठेवली होती. गेल्या दीड वर्षापासून हेलपाटे मारून देखील ठेवीदारांना ठेवी मिळालेल्या नाहीत. काही ठेवीदारांनी आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. या पंतसंस्थेच्या गैरव्यवहारात आरोपी असलेल्या पोपट ढवळे याने पारनेर तालुक्यातील सहकार क्षेत्रात असणाऱ्या पतसंस्था व मल्टीस्टेट संस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणीत आणले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर ढवळे यांच्यामुळे काही ठेवीदारांनी आत्महत्या केल्या असून, त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा. तसेच संपदा पतसंस्थेप्रमाणे राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेतील सभासद व ठेवीदार यांना न्याय देण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

# ना.छगन भुजबळ यांच्या उमेदवारीवरून महाराष्ट्रातील ओबीसी समाज आक्रमक

## येणाऱ्या निवडणुकीत ओबीसी समाज तुम्हाला धडा शिकवेल- नागेश गवळी

**अहमदनगर । प्रतिनिधी**
१९३१ साली जनगणनेनुसार देशात ५४% देशाच्या लोकसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त ओबीसी समाज आहे. नाशिक मध्ये नामदार छगन भुजबळ यांनी उमेदवारी स्वतःहून मागे घेण्याची भूमिका घेतली.ही ओबीसी समाजासाठी क्लेशदायक बाब आहे. महाराष्ट्रात केवळ एका समाजाचा दबावाला बळी पडून महायुतीचे सरकार ना.भुजबळ साहेबांना उमेदवारी नकारात असेल तर महायुतीच्या सरकारला एकट्या समाजाची मतांची गरज आहे का.ओबीसी समाजाच्या मतांची गरज वाटत नाही काय? हा थेट सवाल सर्व पक्षांना केला आहे. नामदार छगन भुजबळ साहेबांच्या महाराष्ट्राच्या सीमा अडवायचा तुम्ही प्रयत्न करीत असाल तर आज फक्त उमेदवारी अर्ज भरावयाचे काम सुरू आहे मतदान होण्याचे काम बाकी आहे. जेव्हा ओबीसी समाज अडचणीत होता तेव्हा नामदार छगन भुजबळ साहेबांनी आमच्या पाठीशी उभे राहून महाराष्ट्रात महाएल्गार मेळाव्या घेतले. देशाचे गृहमंत्री अमित शहा व पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांनी नामदार छगन भुजबळ साहेबांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने नामदार छगन भुजबळ यांची उमेदवारी डावलून ओबीसी समाजावर अन्याय केला आहे. ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या आहेत.येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत ओबीसी समाज धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.असे प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी यांनी केले आहे. माळीवाडा येथे महायुती सरकारने नामदार छगन भुजबळ यांची उमेदवारी डावलल्याने सकल ओबीसी समाज व समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.याप्रसंगी समता परिषदेचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अंबादास गारुडकर,जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे,नाभिक संघटना जिल्हाध्यक्ष अनिल निकम,बबन भूमकर,डॉ. स्मिता तरटे, गोरख आळेकर, दत्तात्रय व्यवहारे,गणेश व्यवहारे आदी उपस्थित होते.



# अंधत्व आलेल्या ७० वर्षीय हिरा बाईला फिनिक्सने दिली नवदृष्टी

**अहमदनगर । प्रतिनिधी**
काचबिंदूने एका डोळ्यास निर्माण झालेला दृष्टीदोष तर दोन वर्षापूर्वी मोतीबिंदूने दुसऱ्या डोळ्याला ग्रासले असताना आलेल्या अंधत्वाने व आर्थिक परिस्थिती अभावी पेचात सापडलेल्या ७० वर्षीय हिराबाई काळोखे यांच्यावर फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून काचबिंदू असलेल्या डोळ्याची शस्त्रक्रिया करुन त्यांना नवदृष्टी देण्याचे काम करण्यात आले. अंधारलेल्या जीवनाला पुन्हा दृष्टी मिळाल्याने काळोखे यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.



दुष्काळी कर्जत तालुक्यातील हिराबाई काळोखे यांना दृष्टीदोष निर्माण झालेले असताना व आर्थिक परिस्थिती बेताची आणि डोळ्यांची शस्त्रक्रिया अवघड, खर्चिक होती. त्या उपचारासाठी नागरदेवळे (ता. नगर) येथील फिनिक्सच्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात सहभागी झाले. त्यांनी फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांची भेट घेवून संपूर्ण परिस्थिती सांगितली. बोरुडे यांनी तात्काळ डॉक्टरांना सूचना करुन त्यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलला पाठविले. त्यांच्या एका डोळ्यावर काचबिंदूची अवघड शस्त्रक्रिया करुन त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे काम करण्यात आले.

शस्त्रक्रिया करुन काळोखे शहरात आले असता त्यांच्या स्वागतासाठी आलेल्या जालिंदर बोरुडे यांना त्यांनी कवटाळून घेतले. या भावनिक भेटीने उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा पाणवळ्या. फिनिक्स फाऊंडेशन घेत असलेल्या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराच्या माध्यमातून अनेक दीनदुबळ्या, कामगारवर्ग व आर्थिक दुर्बल घटकांना नवदृष्टी मिळत आहे. तर मोतीबिंदू असलेल्या दुसऱ्या डोळ्यावरही लवकरच शस्त्रक्रिया मोफत करण्याचे आश्वासन त्यांना देण्यात आले.

सह्याद्रीचा राखणदार



# आयएमए चंद्रपूरला देशात एक नंबरवर आणण्यासाठी प्रयत्न करा-ना.मुनगंटीवार






**चंद्रपुर । प्रतिनिधी**

आयएमए ही जिल्ह्यातली डॉक्टरांची प्रतीथयश संघटना आहे. मागील काही वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यातील आयएमएच्या पदाधिऱ्यांनी अतिशय उत्कृष्ट काम केले आहे. त्यामुळे आता सर्वोत्तम काम करून देशात आपला जिल्हा नंबर एक करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर आयएमएच्या पदग्रहण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून राजुरा येथील आमदार सुभाष धोटे, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. शिवकुमार ऊत्तुरे, महाराष्ट्र मेडिकल न्सीलचे ॲडमिनीस्ट्रेटर डॉ. विंकी रूघवानी, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. महादेव चिंचोळे, भाजपाचे जिल्हा महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे व अन्य डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी अध्यक्षा डॉ. कीर्ती साने, सचिव डॉ. कल्पना गुलवाडे, कोषाध्यक्ष डॉ. अपर्णा देवईकर यांनी आपला पदभार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना सुपुर्द केला. यामध्ये नवनियुक्त अध्यक्ष डॉ. संजय घाटे, सचिव डॉ. प्रविण पंत, कोषाध्यक्ष डॉ. अप्रतिम दीक्षित यांचा समावेश आहे. याप्रसंगी डॉ. कीर्ती साने, डॉ. कल्पना गुलवाडे, डॉ. अपर्णा देवईकर तथा डॉ. संजय घाटे यांचे समयोचित भाषण झाले.याप्रसंगी बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले, माझ्या मंत्री पदाच्या कार्यकाळात चंद्रपूरला शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, कॅन्सर हॉस्पिटल, शंभर खाटांचे कामगारांचे रूग्णालय मंजूर झाले आहे. आयएमएला एक स्थायी स्वरूपाचा हॉल असावा यासाठी मी शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात जागा पाहण्यासाठी आपल्याला आधीच सुचविले होते. त्यासंदर्भात पाठपुरावा करून लवकरात लवकर हा हॉल बांधण्यासाठी आपण प्रयत्न करू. याप्रसंगी जुन्या चमुने उत्तम काम केले असे कौतुकास्पद उद्गार ना. मुनगंटीवार यांनी याप्रसंगी काढले. त्याचबरोबर नवीन चमूची जबाबदारी वाढली आहे. त्यामुळे यापुढे त्यांना दुप्पट उत्साहाने काम करावे लागेल.याप्रसंगी बोलताना ना. मुनगंटीवार पुढे म्हणाले, मी परदेशात गेलो असताना तेथील वैद्यकिय सेवा उत्तम असेल असा माझा समज होता. परंतु परदेशापेक्षा भारतातील वैद्यकिय सेवा जास्त चांगल्या आहेत आणि त्या तुमच्यामुळेच शक्य आहे. अठराव्या शतकात विज्ञान, तंत्रज्ञान कमी होते. परंतु परस्परांमध्ये प्रेम होते. आता विज्ञान, तंत्रज्ञान अद्ययावत झाले आहे. परंतु एकमेकांमधील स्नेह कमी झाला आहे. अश्या वेळेला आयएमएने या संस्थेला एक परिवार म्हणून एकत्र करावे व कार्यक्रमांच्या माध्यमातून एकमेकांमधील स्नेह वाढविण्याचे काम करावे.

# डॉ.अविनाश ढोक यांच्या तैल चित्राला अभिवादन करून स्मृतिदिन साजरा

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील दिवंगत डॉक्टर अविनाश ढोक यांचा तृतीय स्मृतिदिन बस स्टॅन्ड परिसरातील त्यांच्या तैल चित्राला अभिवादन करून व त्यांना पुष्पहार टाकून पार पाडण्यात आला.

कोरोना काळात रुग्णांना सेवा देत असताना त्यांना कोरोनाचा संसर्ग होऊन त्यामध्येच त्यांचा आकस्मिक मृत्यू झाला होता. यानिमित्ताने त्यांच्या स्मृती प्रखरपणे अनेक मान्यवरांकडून मांडण्यात आल्या.


दिवंगत डॉक्टर अविनाश ढोक हे चंद्रपूर जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती व फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ता तसेच दलित पीडित शोषित वर्गाचे आधारस्तंभ होते. त्यांनी आपल्या सामाजिक व राजकीय जीवनात निस्वार्थीपणे समाजाची सेवा केली. डॉक्टरकी पेशामध्ये जीवन जगत असताना




शंकरपूर व परिसरामधील गोरगरीब रुग्णांना त्यांच्या अडचणीत साथ देऊन रुग्णसेवा दिली. असा सर्वसामान्यांचा पाठीराखा, गोरगरिबांसाठी धावून जाऊन त्यांना मदत करणारा कार्यकर्ता जनसामान्यातून निघून गेला. त्या निमित्ताने शंकरपूर व परिसरामध्ये जी पोकळी निर्माण झाली, ती कधीही भरून न निघणारी आहे.

अशा प्रेरणा स्त्रोताची पुण्यतिथी दिनांक २० एप्रिल रोज शनिवारला करण्यात आली. यानिमित्ताने बौद्ध पंच कमिटी शंकरपूरच्या अध्यक्षा यश्वकला अविनाश ढोक, शारदा गायकवाड, अनिल शेंडे, जगदीश श्रीराम, प्रफुल डांगे, मनोहर रंधये, विजय मून, शेषराव गायकवाड, प्रदीप मेश्राम, नारायण चौधरी, अरविंदजी सांगोळे, शैलेश गायकवाड, इत्यादी कार्यकर्त्यांनी तसेच आप्त परिवार व मित्रपरिवार आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

# सिलेंडर लीक असल्याने लागली घराला आग;अंदाजी ४ लाखांचे नुकसान





**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या नाचनगांव वार्ड नं २ मधे एका घराला दुपारी १.३० वाजता चा दरम्यान सिलेंडर लिक असल्याने आगी ने पेट घेतला.

घर मालक शैलश उपाध्ये व पुनम उपाध्ये हे दोन भावाचे परिवार राहत होते. आग लागली तेव्हा घरात शैलेश व पत्नी एक मुलगा, एक मुलगी सर्व परिवार घरी होते. आगीची माहिती कळताच नाचनगाव परिसरातील मोठ्या प्रमाणावर नागरिक आग विझविण्यासाठी आले होते.

केंद्रीय दारूगोळा भांडाराचे अग्नीशमन दलाला कळविले.ते त्वरित घटनास्थळी आले.आगीवर नियंत्रण केले. त्यानंतर देवळी अग्निशमन गाडी तिथे पोहचली. सर्व घरातले साहित्य जळले.फ्रीज,कुलर मुलांचे शिक्षण साहित्य, दिवान,आलमारी इत्यादी जळून गेले.शैलेश छोटीशी खरमुरेचा(फिंगर )हाथठेला लावत होता. हातमजुरीचे काम करत होते.घरमाती चे असल्याने वेळूफाटे, असल्याने आगी ने लवकर उग्र रूप धारण केले. अंदाज ४ लाखांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली.मोठ्या प्रमाणावर नागरिक तिथे जमा झाले.पुलगाव नगरपालिकेची अग्नीशमन गाडी बंदोबस्तासाठी वर्धेला गेल्यामुळे गाडी उपलब्ध नव्हती. माजी पंचायत समिती सभापती मनोज वसू यांनी प्रयत्न केल्याने सि.ऐ.डी अग्नीशमन गाडी घटनास्थळी १० मिनिटात घटनास्थळी आल्याने आग आटोक्यात आली. केंद्रीय दारूगोळा भांडाराच्या अग्निशमन दलाचे कौतुक होत आहे

# लोकशाहीचा विचार रघुकुलाची देण-प्रा. श्याम देशपांडे

**पुलगाव । प्रतिनिधी**


जगातील अनेक राष्ट्र त्या राष्ट्राच्या राष्ट्रीय विचारधारेनुसार वर्तमानात ज्या लोकशाही राज्यव्यवस्थेनुसार त्या लोकशाहीचा विचार जगाला देणारे पहिले राज्य हे रघुकुल वंशाचे होते. महाराज दशरथ यांनी प्रजाजणांचा कौल, मंत्रिमंडळाचा निर्णय आणि राजपुरोहित वशिष्ठ यांच्यासमोर प्रस्ताव ठेवून त्यांचा निर्णय एकमताने झाल्यानंतरच श्री रामाला राज्याभिषेकाचा निर्णय घेतला होता. याचा अर्थ वंशपरंपरेने राजेशाही असली तरी निर्णय मात्र बहुमताने घेतला जाणे ही लोकशाहीची नांदी होती. असे प्रतिपादन प्राचार्य श्याम देशपांडे यांनी श्री राम कथा समाप्तीच्या निरूपणात केले.

दिनांक ९ एप्रिल ते १६ एप्रिल पर्यंत श्री राम नवमी निमित्त दिनकरराव ओक परिवाराच्यावतीने आयोजित श्रीराम कथा निरूपण यज्ञात हे बोलत होते. मातृभूमीच्या भक्ती बाबत बोलताना ते म्हणाले, सुवर्णमयी लंकेचा स्वीकार करण्याचा प्रस्ताव बिभीषणांनी मांडलेला असताना त्याला नाकारून अयोध्येची जन्मभूमी हीच माझे सर्वस्व आहे असे ठामपणे सांगणारे श्रीराम हे वर्तमानत पाश्चिमात्य देशात जाऊन तिथलेच नागरिकत्व स्वीकारून राष्ट्राकडे पाठ फिरवणाऱ्या नागरिकांसाठी राष्ट्रभक्तीचा आदर्श दीपस्तंभ होय. या विचाराच्या समर्थनार्थ त्यांनी पाश्चिमात्य राष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर जाणाऱ्या लोकांच्या उदाहरणात स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, सेनापती बापट, महात्मा गांधी आणि अनेक क्रांतिकारक, राष्ट्रभक्त, देशभक्त आदीचा उल्लेख करून थोर महात्म्यांची साक्ष दिली. सावरकरांच्या सागरा प्राण तळमळला तील नभी नक्षत्री एक बहुतची प्यारा मज भरत भूमीचा तारा हे कडवे सांगून समारोप केला.

आपल्या आठ दिवशीय प्रवचनात दशरथांचे राज्य,पुत्र कामेष्टी यज्ञ, अहिल्या उद्धार, सागरी सेतू, वाली वध, रावण वध आधी कथा नकातील विज्ञान आणि अध्यात्मिक रहस्य त्यांनी उलगडून दाखविले.

समारोपप्रसंगी प्राध्यापक देशपांडे यांचा शाल,श्रीफळ आणि मानधन तसेच भक्तांनी अर्पण केलेला निधी त्यांना दिला असता त्यांनी तात्काळ तो सर्व निधी वर्धा येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक स्मृती उद्यान कार्यासाठी समर्पित करून त्याची पावती सर्व समक्ष दिनकरराव यांच्या स्वाधीन केली.

प्रतिदिन चालणाऱ्या या ज्ञान यज्ञासाठी तालुका संघचालक अरविंद हलमारे,पूर्व तालुका संघचालक विजयराव निवल, वर्धा नागरी बँकेचे माजी अध्यक्ष केशवराव दांडेकर, तालुका कार्यवाह मनोज राऊत, सहकार्यवाह सतिश तांबूसकर,,डॉक्टर प्रकाश हनुमंते,प्रज्ञा हनुमंते, सुधाकरराव मुळे, डॉक्टर हेडगेवार पतसंस्थेचे अध्यक्ष जयंतराव ओक, मिसाबंदी अरविंद ओक, माजी पंचायत पतसंस्थेचे सदस्य दिलीप अग्रवाल, सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष सुनील नागतोडे, सुनील गिरूळकर,सचिन मुळे, आधी अनेक पुलगाव नाचनगाव परिसरातील मान्यवरांनी भेट दिली. अनेक शिक्षक,प्राध्यापक, विद्यार्थी, महिला, पुरुषांनी प्रतिदिन कथेचा लाभ घेतला.



# इको-प्रो मध्ये कोणतीही फूट नाही; संस्था 'एकजुट'

## इको-प्रो संस्थेच्या सक्रिय कार्यकर्त्यांची बैठक;डिजिटल माध्यमातून प्रकाशित बातमी संभ्रम निर्माण करणारी

**चंद्रपुर । प्रतिनिधी**

इको-प्रो संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बंडू धोतरे यांनी नुकतेच काँग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले. त्यावर एका डिजिटल माध्यमातील चंद्रपुरातील न्यूज पोर्टलने कोणतीही शहानिशा न करता इको-प्रो मध्ये फूट पडल्याचे वृत्त प्रकाशित केले. त्यामुळे कोणतेही कारण नसताना कार्यकर्त्यात संभ्रम निर्माण झाला. त्या पार्श्वभूमीवर इको-प्रो संस्थेच्या सक्रिय कार्यकर्त्यांची बैठक रविवारी बैठक घेण्यात आली. इको-प्रो मध्ये कोणतीही फूट नाही; संस्था 'एकजुट' असल्याचे स्पष्ट करीत त्या वृत्ताचे खंडन करण्यात आले. दरम्यान खोटे व एकतर्फी वृत्त देणाऱ्या या पोर्टलमुळे संस्थेची नाहक बदनामी झाली आहे.

इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे यांनी व्यक्तिगत निर्णय घेत काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व स्वीकारण्याची भूमिका घेतली. तसे व्यक्तिगत पत्र दिले, त्यावर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांनी काँग्रेसमध्ये स्वागत करीत असल्याचे पत्र दिले. मात्र, शहरातील एका पोर्टलने कोणतेही शहानिशा न करता परस्पर वृत्त प्रकाशित करून बदनामी केली. कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या संभ्रमामुळे आज रविवार, २१ एप्रिल रोजी इको-प्रो संस्थेचे जुने-नवे सर्व सदस्य यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत काँग्रेस सदस्यत्वासाठी लिहिलेल्या पत्राचे वाचन करण्यात आले. सोबतच न्यूज पोर्टलमध्ये छापून आलेल्या बातमीचे सुद्धा वाचन करण्यात आले. यानुसार उपस्थित सर्व सदस्यांनी दोन्ही बातमी आणि पत्रातील तथ्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर पत्रामध्ये असं कुठलंही विधान करण्यात आलेलं नाही किंवा तसे काहीच लेखी देण्यात आलेले नाही, ही बाब स्पष्ट झाल्याने काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. सोबतच बंडू धोतरे यांनी आपली भूमिका सुद्धा स्पष्ट केली.

त्यानुसार बंडू धोतरे हे व्यक्तिगत पातळीवर काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केलेला आहे. संस्थेचा कुठलाही पाठिंबा काँग्रेस किंवा उमेदवाराला देण्यात आलेला नाही. त्यानुसार संस्था मागील २० वर्षापासून आपल्या कार्याचे स्वतंत्र अस्तित्व ठेवून आहे. तसे पर्यावरण व सामाजिक क्षेत्रातील भरीव कार्य यापुढेही निष्पक्षपणे सुरू राहणार आहे. बंडू धोतरे यांच्या काँग्रेस प्रवेशाने यावर कुठलाही फरक पडणार नाही. नेहमीप्रमाणे इको-प्रो संस्था आपली भूमिका घेताना सरकार कोणती आहे, कुणाची आहे? याचा विचार न करता आपल्या नेहमीच्या पद्धतीने कार्य करणार आणि भूमिका मांडणार आहे, असे सभेत स्पष्ट झाले.संस्थेत कुठलीही फूट नसून, यापुढे सर्व सदस्य संस्थेसोबत राहून 'एकजूट' राहणार असल्याचे सर्वांनी एकमताने ठरविले. इको-प्रो संस्थमध्ये अनेक विचाराचे, अनेक पक्षाचे कार्यकर्ते आहेत ते व्यक्तिगत पातळीवर वेगवेगळ्या पक्षात काम जरी करत असले तरी, चंद्रपूर शहरासाठी किंवा चंद्रपूर जिल्ह्यातील विविध प्रश्नासाठी आम्ही सर्व एक आहोत आणि एक म्हणूनच आम्ही कार्य करत राहू अशी ग्वाही सर्वांनी दिली. बैठकीत इको-प्रो संस्थेचे बंडू धोतरे यांच्यासह धर्मेंद्र लुनावत, ओम वर्मा, सुभाष शिंदे, अनिल अडगुरवार, बंडू दुधे, नितीन रामटेके, सुधीर देव, सचिन धोतरे, सुमित कोहळे, मनीष गावंडे, संजय सब्बनवार, विजय हेडाऊ, सुनील मीलाल, किशोर वैद्य, रवी गुरनुले, प्रकाश निर्वाण, सागर कावळे, राजू काहिलकर, योगेश गावतुरे, जितेंद्र वाळके, कपिल चौधरी, सुनील लिपटे, सनी दुर्गे, महेंद्र शेरकी आदी सदस्य उपस्थित होते.



> "काँग्रेस सदस्य म्हणून म्हणून माझी व्यक्तिगत आणि स्वतंत्र भूमिका घेतली आहे, त्याचा संस्थेची कुठलाही संबंध नाही. इको-प्रो ही संस्था नेहमीप्रमाणे कार्य करताना, प्रत्येक विषयावर आपली स्पष्ट आणि निपक्ष भूमिका असेल, तेव्हा या भुमिकेसोबत आम्ही कायम असणार आहे. संस्थेत पूर्वीपासून अनेक पक्षातील सदस्य असून ते सुद्धा संस्थेत कार्य करीत आहेत, संस्थेत कुठलाही संभ्रम नसून आम्ही एकजूट आहोत.
>
> -बंडू धोतरे

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .